दि.दावा क्र.१२७/२०१५
नि.क्र.१६

**<u>वादीचा साक्षीदार क.१ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे ॲड. श्री. एल.आर. मांडवकर यांचे मार्फत :-</u>**

माझे मुळ गाव उमरेड आहे. मी उमरेड येथे एमएसईबी येथे नौकरीला होतो. मी १९७२ पासून उमरेडला नौकरीवर होतो. मी सेवानिवृत्त येथूनच झालो. किती वर्षापासून प्रतिवादीने अतिक्रमण केले, हे मला आठवत नाही. प्रतिवादीने १९७८ मध्ये अतिक्रमण केले असावे, तेव्हा मी बाहेरगावी नौकरीला होतो. मी १९७८ साली अरोली मोरगाव तांडा या गावी नौकरीला होतो. उमरेडपासून ते गाव १०० कि.मी. वर आहे. माझी उमरेडला शेती नाही. माझी शेती पिपरा या गावी होती.

मी माझे वडिलोपार्जीत घरी नेहमी येत होतो. मी नौकरीवर येत असतांना सुध्दा मी वडिलोपार्जीत घरी येत होतो. मी वत्सलाबाईला अतिक्रमण केल्यासंबंधी नोटीस दिला नव्हता. मी पोलीस स्टेशनला सुध्दा तिचेविरूध्द फिर्याद दिली नव्हती. तिने १०.६७ जागेवर अतिक्रमण केले आहे. मी तंतोतंत लांबी रूंदी सांगू शकत नाही. अतिक्रमण केले म्हणजे झोपडे बांधले आहे. मी वत्सलाबाईविरूध्द कोर्ट कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वत्सलाबाईने तिचे घर तिच्या जागेवर बांधले होते. हे म्हणणे खरे आहे की, वत्सलाबाईने ते घर अन्नपूर्णा मोतनकर हिला किरायाने दिले होते.

हे म्हणणे खरे आहे की, अन्नपूर्णा ही वत्सलाबाई हिला किराया देत होती. हे म्हणणे खरे आहे की, मी किरायाबद्दल काही हरकत घेतली नव्हती. अन्नपूर्णा मोतनकर अंदाजे २५ ते ३० वर्षापासून किरायाने राहत होती. अन्नपूर्णा मोतनकर ही माझी भासी लागते. ती माझी सख्खी भासी नाही. हे म्हणणे खरे आहे की, अन्नपूर्णाबाईने बरोबर किराया न दिल्याने वत्सलाबाई हिने तिच्याविरूध्द एसडीओ कार्यालयात प्रकरण दाखल केले होते. एसडीओ

कार्यालय यांनी अन्नपूर्णाबाईला किराया संपूष्टात आणण्याकरिता नोटीस दिला होता. एसडीओ यांनी दिलेल्या परवानगीप्रमाणे वत्सलाबाई हिने अन्नपूर्णा बाईविरूध्द दावा दाखल केला होता. तो दावा क्र.५४/१९९७ असा आहे.

हे म्हणणे खरे आहे की, २००२ साली दिवाणी दावा क्र.८१/२००२ मी दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, लोकन्यायालयामध्ये दाव्याबद्दल समझौता झाला होता. वत्सलाबाईने माझे जागेच्या पूर्व दिशेला अतिक्रमण केले होते. हे म्हणणे खरे आहे की, वत्सलाबाईचे घेतलेले घर रोडला लागून आहे. हे मला माहित नाही की, अन्नपूर्णाबाईचे बाजून दाव्याचा निकाल लागला होता. वत्सलाबाईने अन्नपूर्णाबाईचे विरोधात हकरसी दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, ते किराणाचे दुकान मी चालवायला घेतले.

माझ व वत्सलाबाई यांच्या आपसी समझौत्यामध्ये अतिक्रमण निघाल्यास जागा सोडून दयायचे ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार सिटी सर्व्हे कार्यालयामार्फत मोजणी झाली होती. मोजणी झाल्यानंतर मी कोर्टामार्फत कब्जा घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अन्नपूर्णाबाईच्या ताब्यात असलेल्या किरायाच्या जागेचा ताबा माझेकडे होता त्यामुळे मी वत्सलाबाईला ताबा देत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, वत्सलाबाईने माझेविरूध्द वारंट काढला होता. हे म्हणणे खरे आहे की, वत्सलाबाईने कोर्टामार्फत जागेचा ताबा माझेकडुन घेतला. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या हकरसी मध्ये सदर तथाकथित जागा माझी आहे असा मी उजर घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो उजर फेटाळला होता.

हे म्हणणे खरे नाही की, वत्सलाबाई हिने कोर्टाच्या बेलीफमार्फत वादजागेचा ताबा माझेकडून व अन्नपूर्णाबाईकडून घेतला. हे म्हणणे खरे आहे की, तो कमरा वत्सलाबाई व तिचे वारसान चे ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा दाखल करण्यापूर्वी जागा सिटी सर्व्हे कार्यालयाकडुन मोजून घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दावा हा मी जागेची मोजणी

करून टाकला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील जागा व हकरसी मधील जागा वेगवेगळी आहे. दावा दाखल करण्यापूर्वी मी मोजणी केली होती. ती मोजणी कोणत्या वर्षी मी केली हे माझे लक्षात नाही.

हे म्हणणे खरे आहे की, किरायाच्या वसुलीकरिता वत्सलाबाईने आर.डी. क्र.१६/२०११ दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, वत्सलाबाईने संपूर्ण रक्कम हकरसीमार्फत अन्नपूर्णाकडून वसूल केली. हे म्हणणे खरे आहे की, वादकमरा हा रोडला लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, अन्नपूर्णा हिचे किराणा दुकान चांगले चालत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी अन्नपूर्णा बाईशी संगणमत करून हा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की, वत्सलाबाई हिने किरायाची व हकरसी मार्फत निघणारी रक्कम अन्नपूर्णाबाईकडून वसूल केली. हे म्हणणे खरे नाही की, वादजागेशी माझा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादजागा ही सिटी सर्व्हे मार्फत मोजून हा दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष,

दि.न्या क.स्तर.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
उमरेड.
दि.१६.०३.२०२०